# वाट एकांकिकेला साय-फाय करंडक

**पुणे** : मानवी जीवनावर डिजिटल क्रांतीचा प्रभाव दर्शविणारे एक सशक्त व्यासपीठ तयार करण्यासाठी आयोजित साय-फाय करंडक स्पर्धेत प्रारंभच्या वाट या एकांकिकेने पटकावला, तर फोर डायमेन्शन आणि मिशन परफेक्शन हे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी राहिले. पुणे पोलीस व क्विक हील फाउंडेशनने या करंडकाचे आयोजन केले होते. विजेत्यांना पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभाग (ईओडब्ल्यू) आणि सायबर क्राइम पोलीस उपायुक्त सुधीर हिरेमठ आणि क्विक हील टेक्नॉलॉजीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी संजय काटकर, एक्सप्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.